क्र. माराविम/०२/प्रशासन/४२३२
दि. १८.०६.२०२५

# महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित

म.रा.र.वि.म.
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

## परिपत्रक

**विषय :महामंडळात होणाऱ्या पत्रव्यवहाराच्या स्वरूपाबाबत...**

उपरोक्त विषयान्वये असे निदर्शनास आले आहे की, महामंडळातील अधिकाऱ्यांकडून अंतर्गत तसेच अन्य कार्यालय / विभागांना करण्यात येणाऱ्या पत्रव्यवहारात पत्र दोन अथवा अधिक पानांचे असल्यास त्याचे पहिले पान हे महामंडळाच्या लेटरहेडवर असते परंतु पुढील मजकूर हा स्वतंत्र पानांवर प्रिंट केला जातो.

अशा पध्दतीच्या पत्रव्यवहारामुळे दुसऱ्या स्वतंत्र पानावर संबंधित अधिकाऱ्याची सही असल्यास पहिले लेटरहेडचे पान बदलले जाऊ शकते. तसेच पत्राची पाने वेगवेगळी झाल्यास ती हरवू शकतात. त्यामुळे संबंधित पत्रांबाबत भविष्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. शिवाय, पत्राची पाठपोट प्रिंट न घेतल्यामुळे कागदांचा देखील अपव्यय होतो. तसेच याबाबत असेही निदर्शनास आले आहे की, पत्रांवर स्वाक्षरी करताना संबंधित अधिकाऱ्याच्या स्वाक्षरी खाली त्याचे केवळ पदनाम नमूद असते. केवळ स्वाक्षरी वरून संबंधित अधिकाऱ्याचे नाव समजून येत नाही. त्यामुळे भविष्यात याबाबत काही न्यायालयीन प्रकरणे अथवा अन्य प्रकरणांमध्ये पूर्वीच्या पत्रव्यवहाराचा संबंध आल्यास ती पत्रे कोणाच्या स्वाक्षरीने निर्गमित झाली होती हे कळण्यास अडचणी निर्माण होतात.

यास्तव, कागदांचा अपव्यय टाळण्यासाठी तसेच कार्यालयीन कामकाजात सुसुत्रता आणण्याच्या दृष्टीने महामंडळातील सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांना सुचित करण्यात येते की, यापुढे कोणताही अंतर्गत तसेच अन्य कार्यालय / विभागांना पत्रव्यवहार करतांना पत्राचे प्रिंट हे पाठपोटच घ्यावे. तसेच पत्रावर स्वाक्षरी करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याने त्याचे पूर्ण नाव व पदनाम न चूकता नमूद करून स्वाक्षरी करावी. जेणेकरून भविष्यात येणाऱ्या अडचणी टाळणे शक्य होईल.

वरीलप्रमाणे सुचनांचे पालन न झाल्यास संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्याविरूध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल याची सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

**(रामदास खेडकर)**
**महाव्यवस्थापक (प्रशासन व वाणिज्य)**
**म.रा.र.वि.म. (मर्या.), मुंबई**

**प्रति,**

१. **सर्व विभाग प्रमुख / शिबिर कार्यालय प्रमुख / मुख्य अभियंते,**
म. रा. र. वि. म. (मर्या.), मुंबई तसेच सर्व शिबिर कार्यालये.

२. **सर्व अधिकारी / कर्मचारी,** म. रा. र. वि. म. (मर्या.), मुंबई तसेच सर्व शिबिर कार्यालये.

**प्रत माहितीस्तव :**

१. मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.रा.र.वि.म.(मर्या.), मुंबई.
२. मा. सह व्यवस्थापकीय संचालक (१ / २ / ३), म.रा.र.वि.म.(मर्या.), मुंबई.
३. निवड नस्ती.

**सीआयएन** : U45200MH1996SGC101586
**जीएसटी** : 27AAACM6833C1ZP

**नोंदणीकृत कार्यालय** : नेपियन्सी रोड, प्रियदर्शनी पार्क जवळ, मुंबई - ४०० ०३६

**दूरध्वनी** : (०२२) २३६८ ५९०९
**दूरध्वनी** : (०२२) २३६१ ३७८९
**दूरध्वनी** : (०२२) २३६९ १०३०

**कार्पोरेट कार्यालय** : वांद्रे रेक्लेमेशन डेपोसमोर, लिलावती हॉस्पिटलजवळ, के.सी.मार्ग, वांद्रे (प), मुंबई - ४०० ०५०

**दूरध्वनी** : (०२२) २६४० ०१९० / २०१
**दूरध्वनी** : (०२२) २६५५ ८१७५ / ७६
**फॅक्स** : (०२२) २६४१ ७८९३

www.msrdc.org

Scanned with OKEN Scanner